म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा.
दा. क. ६४४६

...ाय माला

२०५ वे

# भारतीय सण व उत्सव

सौ. कुमुदिनी रांगणेकर



IRBK-0106446

श्रावण

दा. क्र. ६४४६

स्वाध्यायमाला : पुष्प २०५ वें

प्रथम विभाग

भारतीय सण व उत्सव

# श्रावण मास

२२६३२
८२९
३०/७/५०-

लेखिका

सौ. कुमुदिनी रांगणेकर, मुंबई.

संपादक मंडळ
डॉ. ग. श्री. खैर, एम्.ए., पीएच्.डी.
श्री. दि. दा. गांगल, एम्.एस्सी.
प्रा. रा. वि. ओतुरकर, एम्.ए.
श्री. मु. ल. जोशी, एम्. ईडी., बी.एस्सी.
श्री. उ. र. सेवलेकर, बी.ए. (ऑ.), एम्. ईडी.
श्री. इ ...,
क

IRBK-0106446

१८७८ ] किंमत ४० नये पैसे [ १९५७

सर्वाधिकार स्वरक्षित आवृत्ति पहिली

## संपादकीय

पूर्वीं एकत्र कुटुंबपद्धतीच्या काळांत वर्षांत येणाऱ्या सणा-उत्सवांची माहिती आजी अगर आजोबा ह्यांच्या तोंडून एकावयास मिळत असे. कित्येक वेळां त्यांतील कांहीं उत्सव घरीं साजरे केले जात व बाहेरच्या उत्सवांसहि मुलें जात. त्यामुळें भारतीय संस्कृतीची व परंपरेची थोडी का होईना, मुलांना लहानपणींच माहिती मिळे. राम-कृष्णादिकांची प्रथम ओळख आई-वडिलांनीं सांगितलेल्या गोष्टींपासूनच मुलांना पूर्वीं होत असे. परंतु एकत्र कुटुंबपद्धतीचा अभाव, पालकांचा उद्योग-व्यवसाय, उत्सवांचें सध्यांचें घटतें प्रमाण इ. मुळें आज तशी स्थिति राहिलेली नाहीं. छोटया-छोटया पुस्तिकांच्या वाचनानें ही ओळख मुलांना करून द्यावी या दृष्टीनें आम्ही भारतीय सण व उत्सवांसंबंधीं प्रत्येक महिन्याची एक अशा १२ पुस्तिका प्रकाशित करीत आहोंत. सौ. रांगणेकर यांच्यासारख्या नांवाजलेल्या लेखिकेनें आत्मीयतेनें सोप्या भाषेंत थोडक्यांत पुष्कळ माहिती दिली असून पुस्तिकांसाठीं योग्य अशीं चित्रेंहि श्री. गोलिवडेकरांनीं काढून दिलेलीं आहेत. बालकांना व प्रौढ साक्षरांना हीं पुस्तकें आवडतील असा आम्हांस भरंवसा आहे.

### १. मालेंतील पुस्तकांचा उपयोग :

(१) नवसाक्षर नागरिकालाहि आवश्यक असें ज्ञान मालेमुळें मिळतें.

(२) कॉलेज, हायस्कूल, ट्रेनिंग कॉलेज यांमधील विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाच्या विषयांस पूरक अशी माहिती या पुस्तकांत दिलेली आहे.

(३) घरांतील खाजगी ग्रंथालयें, संघ, दल या संस्थांचीं वाचनालयें व प्रौढांचे शिक्षणवर्ग यांसाठीं.

(४) वाढदिवस, मुंज, विवाह या मंगलप्रसंगीं देण्यासाठीं; शाळा, कॉलेज अगर तत्सम संमेलनप्रसंगीं पारितोषिक म्हणून.

### २. पुस्तकांतील विषयांचें स्वरूप :

★ सुसंस्कृत नागरिकास असें वाटत असतें कीं, आपल्या सभोंवतालच्या वस्तु (विमान, रेडिओ, विजेची शक्ति इ.), राजकारणांतील चालू प्रश्न; थोर पूर्वजांचीं चरित्रें, निरनिराळ्या देशांचे स्वातंत्र्येतिहास—यांची माहिती आपणांस असावी. मालेसाठीं विषय निवडतांना वरील दृष्टि ठेविली आहे.

★ शाळेंत स्थूलमानानें ज्या विषयांचें शिक्षण होतें त्या विषयांना पूरक व उपकारक अशी माहितीहि या पुस्तकांतून असते.

★ मनोरंजक पद्धतीनें उपयुक्त विषयांचें ज्ञान, शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांना आणि स्त्री-पुरुष नागरिकांना घरबसल्या देणें हा मालेचा हेतु आहे.

२२६३५

# श्रावण मास

श्रावण महिना हा निसर्गाचा मोठा लाडका महिना आहे. पावसाळा सुरू झाल्याला दीड दोन महिने झालेले असतात. त्यामुळें चहूंकडे कसें हिरवेंगार दिसत असतें! इंद्रधनुष्यांत दिसणाऱ्या मुख्य सात रंगांत हिरवा रंग हा डोळ्यांना सुखविणारा असतो. नि म्हणूनच जिथें तिथें हिरवेंगार दिसलें कीं, डोळ्यांना सुख होतें आणि मनाला आनंद वाटतो!

सृष्टींत सगळीकडे जणूं उत्साह भरलेला दिसतो. आणि म्हणूनच कीं काय, ह्या महिन्यापासून आपल्या सणांनाहि बहर येतो!

शिवाय, श्रावण हा फार पवित्र महिना मानला जातो! चातुर्मासाच्या चार महिन्यांतला हा विशेष महत्त्वाचा महिना!

## नागपंचमी

ह्या महिन्यामधला पहिला सण नागपंचमी हा आहे. श्रावण शुद्ध पंचमीला तो येतो. या दिवशीं घरोघर नागाची पूजा करतात. लहान मुलें मातीचा किंवा पिठाचा नाग तयार करतात.

आणि मोठीं माणसें वारुळाजवळ जाऊन नागाची पूजा करतात. किंवा गंध, हळद-कुंकू, चंदन, केशर ह्या पांचांच्या मिश्रणानें पांच फडी नाग पाटांवर काढून त्याची पूजा करतात. 'नागोबाला



दूऽऽध' असें ओरडत गारुडी त्या दिवशीं गांवांतून हिंडतात नि घरोघरीं माणसें नागाला दूध, लाह्या व पैसा देतात.

श्रीकृष्ण आपल्या सवंगडयाबरोबर खेळत असतांना त्याचा चेंडू यमुना नदीच्या कालिया डोहांत पडला. आणि तो काढण्यासाठीं म्हणून कृष्णानें डोहांत बुडी मारली. वास्तविक त्या डोहांतील कालिया नागाच्या विषानें तेथील पाणी विषारी झालें होतें. तेव्हां कालियाला मारून हें विष नाहीसें करण्याचा कृष्णाचा बेत होता. पण एकदम कालियावर चाल करून जाणें त्याला आवडेना. म्हणून त्यानें आपला चेंडू डोहांत टाकला आणि तो काढण्याचें निमित्त करून त्यानें डोहांत उडी मारली व कालियाला जिंकलें.

कालिया नागाच्या फडेवर उभ्या राहिलेल्या कृष्णाला पाहून गोकुळांतल्या लोकांना वाटलें कीं, कालियानें कृष्णाला संभाळून वर काढला आणि त्यांनीं मोठ्या आदरानें त्या नागाला दूध पाजलें व त्याची पूजा केली. तो श्रावण शुद्ध पंचमीचा दिवस होता म्हणून त्याला नागपंचमी म्हणूं लागले व त्या दिवशीं नागोबाची पूजा करण्याची पद्धत सुरू झाली.

ही झाली नागपंचमीची एक कथा. आतां दुसरी कथा अशी आहे कीं, मणिपूर नांवाच्या गांवीं एक शेतकरी रहात होता. श्रावण शुद्ध पंचमीच्या दिवशीं त्यानें नेहमींप्रमाणें आपलें शेत नांगरलें. पण त्याच्या नांगराचा एक फाळ एका वारूळाला लागला आणि त्यांत असलेलीं नागिणीचीं पिल्लें मेलीं. त्यामुळें ती नागीण चवताळली. तिनें त्या शेतकऱ्याच्या कुटुंबांतील सर्व मंडळींना दंश केला आणि ती माणसें मरून गेलीं. त्या शेतकऱ्याची एक मुलगी लग्न होऊन सासरीं गेली होती. ती मात्र जिवंत राहिली. परंतु चवताळलेली ती नागीण तिच्या सासरच्या घरीं पोंचली.

मुलीनें नागिणीला जणूं भेटावयाला आलेली पाहुणी मानली व तिच्या पुढ्यांत दुधाचा वाडगा ठेवला. तें पाहून ती नागीण खूष झाली. तिचा राग ओसरला आणि तिनें घडलेली सर्व हकीकत मुलीला सांगितली. मुलीनें प्रार्थना केल्यामुळें तिनें शेतकऱ्याच्या सर्व माणसांना जिवंत केलें नि तेव्हांपासून श्रावणी पंचमीला नागाची पूजा करतात.

नाग जसे विषारी असतात तसे मनांत डूख धरणारे असतात हें खरें. पण ती नागीण त्या मुलीशीं बोलली असेल व मेलेल्या माणसांना तिनें जिवंत केलें असेल हें खरें वाटत नाहीं! तरीसुद्धां ह्या गोष्टीपासून एक उत्तम बोध मिळतो आपल्याला!

दुष्ट किंवा वाईट माणसाशींसुद्धां आपण चांगलें वागलों तर तींहि आपल्याशीं चांगलीं वागतात. तेव्हां हें अवश्य लक्षांत ठेवून वागावें.

नागपंचमीला नारळाच्या करंज्या किंवा पातोळ्या करतात. श्रावण महिन्यांत मुळीं सारखें गोड जेवण सुरूंच असतें. श्रावणी सोमवारीं संध्याकाळीं लौकर जेवण्याची केवढी मौज वाटते. दर सोमवारीं वेगवेगळें पक्वान्न आणि शेवटल्या सोमवारीं सोमवार करण्याचें व्रत पूर्ण झालें म्हणून पुरणपोळ्या!

**मंगळागौर**

अन् मंगळवारीं आक्का, ताईची किंवा वहिनीची, काकूची मंगळागौर—देवीच्या नैवेद्यासाठीं केलेले छान छान मोदक खायला मिळतात दर मंगळवारीं.

पण ह्या मंगळागौरीची कथा ठाऊक आहे कां? ऐका हं. फार पूर्वीं कुंडिन नांवाच्या शहरांत धर्मपालक नांवाचा एक ब्राह्मण रहात होता. त्याला मुलगा नव्हता आणि त्या काळीं मुलगा नसलेल्या माणसाला मान नसे. एवढेंच नव्हे तर त्याच्या हातून भिक्षा घेणेंसुद्धां कांहीं साधूंना आवडत नसे.

असाच एक साधू रोज धर्मपालकाच्या घराकडे येई, पण भिक्षा न घेतां जाई. त्यामुळें धर्मपालकाला फार वाईट वाटे. अन् एक दिवस त्यानें चटकन् साधूच्या झोळींत भिक्षा घातली. तें पाहून साधूला राग आला. तेव्हां धर्मपालकानें त्याचे पाय धरून क्षमा मागितली. साधूचा राग शांत झाला आणि त्यानें म्हटलें, "निळ्या रंगाचे कपडे घालून व निळ्या घोड्यावर बसून तूं रानांत जा. जिथें घोड्याच्या पायाला ठेंच लागेल तिथें खण. म्हणजे एक देवी उत्पन्न होईल नि ती तुला हवा असलेला आशीर्वाद देईल!"

धर्मपालकानें लगेच त्याप्रमाणें केलें. निळे कपडे घालून तो निळ्या घोड्यावर बसला आणि रानांत गेला. मग घोड्याला ठेंच लागतांच तो खालीं उतरला. तिथली जागा त्यानें खणली. त्याला एक देऊळ दिसलें. देवळांतील देवीची त्यानें प्रार्थना केली. देवीनें विचारलें, "तुला जर पुष्कळ आयुष्य असलेला मुलगा हवा असेल तर तो वेडा, खुळा मिळेल. आणि शहाणा, गुणी मुलगा हवा असेल तर त्याला आयुष्य थोडें मिळेल! तेव्हां कसला मुलगा हवा?"

धर्मपालकानें विचार करून उत्तर दिलें, "मला गुणी मुलगाच दे, देवी! त्याला आयुष्य कमी असलें तरी चालेल!"

एवढें महत्त्व असतें बरं गुणांना नि गुणी माणसाला! देवी, "तथाऽस्तु!—तसेंच होईल!" असें बोलली अन् नाहींशी झाली.

पुढें देवीच्या प्रसादानें एका वर्षानंतर धर्मपालकाच्या बायकोला अल्पायुषी परंतु गुणी मुलगा झाला. त्याचें नांव शिव असें ठेवलें. हळूहळू मुलगा मोठा झाला. त्याचें लग्न करावें अशी त्याच्या आईबापांना हौस वाटूं लागली. आणि आधीं काशीक्षेत्राला जाऊन श्रीविश्वेश्वराचें दर्शन घेण्यासाठीं तीं तिघें काशीला गेलीं. तिथें देवळांतून परत येतांना त्यांना एका घराच्या अंगणांत कांहीं मुली खेळतांना दिसल्या. लहान मुलांच्या पद्धतीप्रमाणें खेळतां खेळतां त्यांच्यामध्यें भांडण झालें. श्रावण महिन्यांत 'आत्तां ऊन नि आत्तां पाऊस' असा ऊनपावसाचा खेळ चालतो. त्याप्रमाणें लहान मुलें खेळतांना 'आत्तां गट्टी तर आत्तां कट्टी' अशी गंमत होते. तसें भांडतां भांडतां त्या मुली एकमेकींना शिव्यागाळी देऊं लागल्या. अन् एकीनें दुसरीला 'तूं विधवा होशील' अशी शिवी दिली. ह्या दुसऱ्या मुलीचें नांव

सुशीला होतें. आपल्याला दिलेली ही शिवी ऐकून ती म्हणाली, "तुझ्या असल्या शिव्यांनीं माझें कध्धींच वाईट होणार नाहीं! कारण माझी आई मंगळागौरीचें व्रत करीत असते. तेव्हां आमच्या कुळांत कुणीच विधवा होणें शक्य नाहीं!"

सुशीलेनें मोठ्या आत्मविश्वासानें उच्चारलेले हे शब्द ऐकून धर्मपालकाला फार आनंद झाला. त्याच्या मनांत आलें कीं, ह्या मुलीबरोबर आपल्या शिवाचें लग्न केलें तर तो लौकर मरण्याचें भयच नको! कारण सुशीला कधीं विधवा होणार नाहीं ना? मग तिचा धव म्हणजे नवरा विगत होण्याची—मरण पावण्याची —नि त्यामुळें ती विधवा होण्याची जर धास्ती नाहीं तर शिव तिचा नवरा झाल्यावर तो मरण पावण्याची धास्तीच नकोच!

नंतर धर्मपालकानें सुशीलेच्या आईवडिलांची भेट घेतली व सुशीलेचें शिवाबरोबर लग्न झालें.

लग्नानंतर श्रावण महिना आला. सुशीला आपल्या आई-प्रमाणें दर मंगळवारीं मंगलागौरीचें व्रत करूं लागली. आणि शेवटच्या मंगळवारीं पहांटे स्वप्नांत तिला देवी दिसली. तिनें सांगितलें, "आज रात्रीं माझी पूजा वगैरे आटोपल्यावर तूं झोंपीं जाऊं नकोस. कारण आज तुझ्या नवऱ्याला मृत्यु येणार आहे. एक मोठा नाग त्याला दंश करण्यासाठीं येणार आहे. तरी तूं एका घागरींत दूध घालून ठेव. नि तें पिण्यासाठीं नाग आंत शिरला कीं, तुझ्या चोळीनें तूं घागरीचें तोंड बांधून टाक. नि सकाळीं तुझ्या आईला तें वायन दे."

अन् मंगळवारीं उपास होता, पूजा वगैरे करून सुशीला दमली होती तरी ती रात्रीं झोंपीं गेली नाहीं. दुधाची घागर तयार ठेवून ती जागत बसली. अन् खरोखरीच एक नाग आला. नि तो दूध पिण्यासाठीं घागरींत शिरतांच सुशीलेनें घागरीचें तोंड चोळीनें

बांधून टाकलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आपल्या आईला तें वायन दिलें. तिच्या आईला घागरींत मेलेल्या किंवा जिवंत सापाऐवजीं सोन्याचा नाग सांपडला नि शिव दीर्घायुषी झाला.

म्हणून आपल्या नवऱ्याला पुष्कळ आयुष्य मिळण्यासाठीं बायका हें व्रत करितात. आणि सुशीलेच्या श्रद्धेमुळें हा जो चमत्कार घडला त्याची आठवण म्हणून आईला एक घागर, खण व सोन्याचा नाग देतात.

सुशीलेच्या या कथेंत हा मोठा चमत्कार घडला म्हणावयाचा ! आजकाल आपली तशी कितीहि दृढ इच्छा असली किंवा कितीहि, अगदीं भगीरथ प्रयत्न केले तरी आपल्या माणसाचें मरण आपण टाळूं शकणार नाहीं ! परंतु अनेकदां मनाच्या समाधानावर आयुष्याची लांबी अवलंबून असते. तेव्हां आपल्या वडील माणसांच्या मनाप्रमाणें आपण वागल्यामुळें त्यांचें आयुष्य वाढूं शकेल !

**विसोबा खेचर पुण्यतिथि**

ह्यानंतर शुद्ध एकादशी हा एक महत्त्वाचा दिवस आहे. विसोबा खेचर नांवाच्या सत्पुरुषाची पुण्यतिथि ह्या दिवशीं असते.

नामदेवाचे गुरु विसोबा खेचर यांची गोष्ट तुम्ही आषाढ महिन्यांत वाचली आहेच.

विसोबा खेचर हे ज्ञानेश्वर व नामदेव ह्या संतांच्या काळीं होऊन गेले. ह्या दोन संतांच्या सांखळीमधला विसोबा दुवा होते असें म्हणायला हरकत नाहीं. कारण विसोबा नामदेवाचे गुरु होते तर ज्ञानेश्वर विसोबांचे गुरु होते.

विसोबांचें मूळगांव आळंदी. ते विद्वान् होते पण थोडीशी 'ग' ची बाधा होती स्वारीला ! ते ईश्वराची पूजा-आर्चा-प्रार्थना मनापासून करीत. पण 'अनाथांचा नाथ' ह्या ईश्वराच्या

नांवांतील खरा अर्थ त्यांना कळला नव्हता. म्हणूनच त्यांनीं निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई ह्या चौघां अनाथ भावंडांचा एकदां उगीचच छळ केला.

एक दिवस बारा-चौदा वर्षांच्या ज्ञानेश्वराला मांडे खाण्याची इच्छा झाली. नि म्हणून मुक्ताबाई शेजारीं मांडे भाजण्याचा तवा उसना मागावयास गेली. विसोबाला हें कळतांच, कोणीहि मुक्ताबाईला तवा देऊं नये अशी व्यवस्था त्यांनीं केली. जणूं गरीब, अनाथ मुलांना कधीं चांगलेंचुंगलें खाण्याची इच्छा होणें गैर असतें !

बिचारी मुक्ताबाई हिरमुसली होऊन घरीं परतली. तेव्हां ज्ञानेश्वरांनीं विसोबाला थोडा धडा शिकविण्याचा विचार केला. आपल्या पोटांतील उष्णतेमुळें खाल्लेलें अन्न पचतें व ह्या उष्णतेला जठराग्नि—जठर म्हणजे पोट, पोटांतील विस्तव—असें म्हणतात.



तेवढ्या लहान वयांतहि ज्ञानेश्वर मोठे तपस्वी, योगी होते. त्यांनीं योगसामर्थ्यानें आपला जठराग्नि पेटविला आणि आपल्या तापविलेल्या पोटाचा अग्नीसारखा उपयोग करून पाठीवर मुक्ताबाईला मांडे भाजावयास लावलें.

विसोबांनीं हा चमत्कार खिडकींतून पाहिला व त्यांना पश्चाताप झाला. ते ज्ञानेश्वराला शरण गेले. त्यांची मूर्ति लहान पण कीर्ति मोठी आहे हें त्यांनीं ओळखलें. आणि आपल्या एका अभंगांत 'मज ज्ञान हेचि गुरु' असें त्यांनीं चक्क म्हटलें आहे.

ज्ञानेश्वराचा शिष्य झालेला विसोबा जर नामदेवाचा गुरु होऊं शकतो तर पंचविसावा येणारा नंबर पांचवा कां येऊं शकणार नाहीं? साधूसंतांनीं असाध्य तें साध्य केलें आहे. मग ही प्रयत्नांनीं होण्यासारखी गोष्ट आपल्याला कां साधणार नाहीं? म्हणजे विसोबा नामदेवाप्रमाणें आपलेहि गुरु होतील आणि आपला आत्मविश्वास वाढवितील !

**राखी–नारळी पौर्णिमा**

ह्या पुढला सण म्हणजे श्रावणी पौर्णिमा! ह्या पौर्णिमेला दोन नांवें आहेत. नारळी पौर्णिमा व राखी पौर्णिमा.

नारळी पौर्णिमा हा आपल्याकडील विधि आहे. वरुण हा पाण्याचा देव आहे. तेव्हां श्रावणी पौर्णिमेच्या दिवशीं वरुणदेवतेची म्हणून समुद्राची पूजा करून त्याला नारळ अर्पण करावा असें शास्त्रांत सांगितलें आहे.

ह्या पौर्णिमेच्या आधीं दोन अडीच महिने पावसाला सुरुवात झालेली असते. ज्येष्ठ, आषाढांत फारच पाऊस पडत असल्यामुळें ह्या दिवसांत आगबोटींची ये-जा थांबलेली असते. कारण समुद्र त्या वेळीं मधूनच वादळी होतो व मग बोटी बुडण्याचें भय असतें. त्यामुळें दोन, अडीच महिने हा पाण्यांतला व्यापार बंदच असतो. अर्थात्‌च हा काळ व्यापाऱ्यांना मंदीचा असतो! श्रावणी पौर्णिमेच्या सुमाराला समुद्र शांत होतो व मग त्या दिवशीं समुद्रांत नारळ टाकला कीं, आगबोटींची वाहतूक सुरू करण्याचा

परवाना मिळाला असें समजतात. त्यामुळें फक्त हिंदूच नव्हे, तर इतर धर्माचे व्यापारीसुद्धां ही पौर्णिमा महत्त्वाची मानतात. आणि मोठ्या समारंभानें व उत्साहानें समुद्राच्या दर्शनाला जाऊन त्याला नारळ अर्पण करतात.

आतां नारळी पौर्णिमेचें जें दुसरें राखी पौर्णिमा असें नांव आहे त्याचा संबंध मूळ उत्तरेकडील लोकांशीं आहे! ते लोक समुद्रापासून दूर रहातात ना? त्यामुळें समुद्राशीं संबंध असणाऱ्या नारळी पौर्णिमेचें महत्त्व त्यांना कसें कळणार?



ह्या पौर्णिमेच्या दिवशीं तेथील स्त्रिया भावाच्या मनगटावर राखी बांधतात. त्यामुळें त्या स्त्रीला बहीण मानून तिच्या रक्षणाची जबाबदारी तो भाऊ घेत असतो अशी सुंदर कल्पना ह्या कृतीच्या मागें आहे.

गुजराथ देशाची राणी कर्मवती हिनें मोंगल बादशाह हुमायून ह्याच्याकडे राखी पाठविली होती व त्याला आपला भाऊ मानलें होतें. हल्लीं आपल्या इथें पुष्कळ बहिणी भावाच्या


मनगटावर राख्या बांधतात. पण ह्या राखीबंधनाच्या पाठीमागें असलेला पवित्र हेतु कोणींच लक्षांत घेत नाहीं! ज्यांच्याकडून राखी बांधून घ्यावयाची त्यांच्या रक्षणाची जबाबदारी त्यामुळें आपल्यावर पडते हें विसरतां कामा नये! बहिणीकडून मारे राखी बांधून घ्यावयाची नि तिनें अभ्यासांत मदत मागितली तर तिच्या अंगावर खेंकसायचें ह्यांत काय अर्थ? राखीबंधनाचा हा हेतु ध्यानांत घेतला म्हणजे कोणींहि दुबळ्या व्यक्तीनें दुसऱ्या बलिष्ठ व्यक्तीच्या हातांत राखी बांधण्यास हरकत नाहीं हें कळून येतें!

उत्तरहिंदुस्थानांत तर नोकर मालकांच्या हातावर राखी बांधतात. गरीब माणसें श्रीमंतांच्या हाताला राखी बांधून त्यांचें हित इच्छितात व आपलें हित साधतात. तेव्हां आपल्या लहान भावंडांकडून आपण अवश्य राखी बांधून घ्यावी व आपला मोठेपणा न विसरतां त्यांच्याशीं वागण्याची शिस्त स्वतःला लावावी.

**गोकुळाष्टमी—श्रीकृष्ण जयंती**

आतां ह्या नंतरचा सण म्हणजे वद्य अष्ठमीला येणारी गोकुळाष्टमी! हा सण मुलांना भारी आवडतो. श्रीकृष्णाच्या बाललीलांची माहिती असल्यामुळें मुलांना तो आपला सवंगडीच वाटतो! त्यानें गोकुळांत केलेल्या गंमती, गाईवांसरांवरील त्याची माया, मित्रांबद्दलचा स्नेह, त्याच्या मुरलीचे सूर वगैरे सारेंच मुलांना आवडतें. पण ह्याच्याबरोबर कृष्णाची मल्लविद्येची आवडहि त्यांना आवडावयाला हवी! लहान वयांत कृष्णानें तालमीच्या व कुस्तीच्या आखाड्यांत मेहनत केली म्हणून

कंसमामानें पाठविलेल्या चाणर व मुष्टिक ह्या मल्लांना तो लोळवूं शकला ! तेव्हां कृष्णाच्या अंगांतील अद्‌भुत गुणांबद्दल



कौतुक करावें नि त्याचें शक्य तेवढें अनुकरण करावें. कधीं कधीं कृष्ण गौळणींच्या खोड्या काढीत असे. म्हणून त्याचें अनुकरण करण्यासाठीं शेजारणींच्या खोड्या करणें चुकीचें ठरेल ! कारण कृष्णानें खोड्या काढल्या तरी तो लगेच त्यांची नुकसानभरपाई करी नि झालेल्या नुकसानीपेक्षां ही भरपाई किती जास्त असे ! कृष्णाप्रमाणें हा गुण आहे कां आपल्या अंगांत ? अर्थात्‌च नाहीं ! तेव्हां त्याच्याप्रमाणें खोड्या करण्याचा अर्थात्‌च आपल्याला हक्क नाहीं ! मात्र त्याच्या इतर गुणांचा कित्ता गिरविण्याचा प्रयत्न प्रत्येकानें अवश्य करावा.

श्रीकृष्णाला गरीब-श्रीमंत, सुन्दर-कुरूप असा भेदभाव वाटत नसे. गाई चारावयाला रानांत नेल्यावेळीं सर्वांत्री शिदोरी तो व त्याचे मित्र एकत्र करीत नि सर्वजण वाटोळें बसून मजेनें

जेवीत. कृष्णाचा आवडता मित्र पेंद्या हा गरीब होता नि कुरूप व लंगडाहि होता. पण तो कृष्णाला फार प्रिय होता. कृष्णाच्या स्वभावांतील हा चांगुलपणा अवश्य लक्षांत ठेवावा नि तो आपल्या आचरणांत आणावा.

त्याचप्रमाणें जातिभेद न धरतां व गरीब-श्रीमंत असा भेद न करितां सर्व मित्रांनीं मजेनें अधून-मधून वनभोजनाला जावें. अन् कृष्णजन्माच्या ह्या अष्टमीच्या दिवशीं कृष्णाला आवडणारे पदार्थ खावेत. दूध, दहीं व फळें यांचा सात्त्विक आहार घ्यावा, म्हणजे उपवास आयताच घडेल. आपल्याकडे उपवास करण्याची जुनी पद्धत आहे. नि ती फार उत्तम आहे. उपवास केल्यानें आरोग्य उत्तम रहातें. आपल्या पोटोबाला थोडी विश्रांति मिळते नि शरीर हलकें व चपळ बनतें. तेव्हां ह्या दिवशीं अवश्य उपवास करावा.

गोकुळांत कृष्णाबरोबर गोप व गोपी रास खेळत. मुलां-



मुलींनीं आतांहि टिपऱ्या खेळाव्यात. व्यायाम व करमणूक एकदम मिळूं शकतात त्यामुळें.

बरं, श्रीकृष्ण गोकुळांत कांहीं नुसतीच गंमत करीत नव्हता. यमुना नदींतल्या कालिया नागाला त्यानें आपल्या शक्तीनें हरविला. आणि त्याच्या विषानें यमुनेचें पाणी विषमय झाल्या-मुळें तें पिऊन गुरें-वांसरें व माणसें मरण पावण्याचें संकट त्यानें दूर केलें. एकदां इंद्रानें चिडून अतिशय जोराचा पाऊस पाडला. घरें-दारें, गुरें-ढोरें फार काय माणसेंसुद्धां वाहून जाण्याचें भय वाटूं लागलें ! तेव्हां श्रीकृष्णानें गोवर्धन पर्वत आपल्या करंगळीनें उचलून सर्वांचें रक्षण केलें ! नि त्यावेळीं सर्वांना हा धडा दिला कीं, गोवर्धन उचलण्याची सर्व लोकांनीं धडपड केली म्हणून कृष्णानें--देवानें--त्यांना मदत केली आणि त्यांची धडपड यशस्वी केली.

आपण मनापासून प्रयत्न करायला हवा ! म्हणजेच देव आपल्याला मदत करतो. तुम्हाला ठाऊक आहे ना, श्रीकृष्णाचा जन्म तुरुंगांत झाला. पण त्याचें कर्तृत्व, त्याच्या अंगांतील शक्ति इतकी सामर्थ्यवान् होती कीं, तुरुंगाचे गज त्याला कोंडून ठेवूं शकले नाहींत ! प्रतिकूल परिस्थितीवर जें मात करूं शकतें तेंच खरें सामर्थ्य !

अभ्यासांत मदत करावयाला कोणी नाहीं, शिकवणी ठेवणें शक्य नाहीं, अशा स्थितींत आपल्या प्रयत्नाच्या जोरावर परीक्षा पास होणें मोठें कौतुकास्पद ! कारण घरांतील प्रतिकूल परि-स्थितीवर तुम्ही मात केली आहे. आयुष्यांत असलें प्रतिकूल प्रसंग हे येणारच ! ‘सुख पहातां जवापाडें । दुःख पर्वता एवढें ।।’ असे संतांनीं म्हटलेंच आहे. जव हें बाजरीएवढें बारीक धान्य असतें. आणि आपल्याला आयुष्यांत जवाएवढें सुख मिळणार. आणि दुःख मात्र पर्वताएवढें कोसळणार. तेव्हां श्रीकृष्णाच्या चरित्रांतील

ह्या ठळक प्रसंगांची आठवण नेहमीं मनाशीं करावी. त्यामुळें निराशा झाल्यावेळीं आपल्याला आशा वाटेल ! मनाला उत्तेजन मिळेल !

गोकुळाष्टमीच्या सणाच्या दिवशीं गोड पक्वान्न खाऊन एक दिवस तोंड गोड होतें. पण कृष्णाच्या चरित्रापासून आपण योग्य बोध घेऊन वागलों तर आपलें सबंध आयुष्यच आपण आनंदमय बनवूं शकूं. म्हणजे आपलें तोंड कायमचें गोड होईल !

आतां श्रावणाच्या शेवटच्या दिवशीं, म्हणजे अमावास्येला एकदम दोन-तीन महत्त्वाचे सण येतात.

**पिठोरी अमावास्या**

ह्या अमावास्येला पिठोरी म्हणतात. सौभाग्यवती स्त्रिया पिठोरीची पूजा करतात. ह्या पूजेची कथा अशी आहे.

फार पूर्वी श्रीधर नांवाच्या एका ब्राह्मणाची सुमित्रा नांवाची बायको होती. तिच्या मोठ्या मुलाचें नांव शंकर व सुनेचें नांव विदेहा होतें. विदेहेचें मूल जगत नसे. एकदां असें झालें कीं, श्रावणी अमावास्येला त्यांच्या घरीं श्राद्ध होतें आणि त्याच दिवशीं विदेहा बाळंतीण झाली.

जुन्या रीतीप्रमाणें बाई बाळंतीण झाली कीं, दहा दिवस, सुयेर पाळतात. बाळंतिणीला नि बाळाला शिवत नाहींत. आणि घरांत कसलेंहि धार्मिक कार्य करीत नाहींत; करूं शकत नाहीं.

आपल्या कुटुंबांत नवा जन्म झाल्यावेळीं सुयेराची ही गोड अडचण येते. आणि कुटुंबांत मृत्यु झाल्यावेळीं सुतकाची कडू अडचण येते ! घरांतील माणूस वारलें कीं, दहा दिवस सुतक पाळावें लागतें ! अन् बिचारी विदेहा फार दुर्दैवी असल्यामुळें तिचें हें नवें मूलहि लगेच मरण पावलें ! आधीं सुयेराची गोड

अडचण आली नि नंतर लगेच सुतकाची कडु अडचण आली आणि श्राद्ध अपुरें राहिलें ! विदेहेच्या सासूला राग आला नि तिच्या सांगण्यावरून शंकरनें विदेहेला घराबाहेर घालविलें.

मृत बाळ घेऊन बापडी विदेहा दूर अरण्यांत गेली. तिथें एक आश्रम होता, त्या आश्रमाजवळ एक देवता होती. ती विदेहेला म्हणाली, "तूं ह्या आश्रमांत लपून रहा. कारण इथें भुतांची फार भीति आहे. परंतु कांहीं वेळानें इथें ६४ योगिनी देवता येतील व त्यांच्या पद्धतीप्रमाणें 'कोणी अतिथि आहे काय ?' असें विचारतील. तेव्हां तूं पुढें होऊन त्यांना शरण जा. म्हणजे तुझें कल्याण होईल ! " त्याप्रमाणें त्या देवता आल्यावर त्यांनीं विचारलें, "कोणी अतिथि–पाहुणा आहे काय ? "

विदेहा भीत भीत पुढें आली नि तिनें सर्व हकीकत त्यांना सांगितली. त्यांच्या कृपेनें तिचीं सर्व मुलें जिवंत झालीं ! मग घरीं तिचें उत्तम स्वागत करण्यांत येऊन तिचें आयुष्य सुखांत गलें !

आपल्या मुलांना भरपूर आयुष्य मिळविण्यासाठीं माता हें व्रत अजुनि करतात. आतां चौरंगावर देवतांच्या मूर्ति किंवा चित्रें मांडतात. पण पूर्वीं पिठाच्या मूर्ति करीत व नैवेद्यासाठींहि पिठाचेच लाडू करीत. बहुधा ह्याचमुळें ह्या पूजेला पिठोरी पूजा हें नांव पडलें असावें. पूजेवरून अमावास्येलाहि पिठोरीच म्हणण्यांत येऊं लागले.

### मातृदिन व पोळा

आईची आपल्या मुलांबद्दलची माया ह्या दिवशीं दिसून येतें. म्हणून हल्लीं कित्येक वर्षें ह्या सणाला मातृदिन––आईचा दिवस––असें नांव देऊन त्याला सार्वजनिक स्वरूप दिलें आहे. शाळांतून ह्या दिवशीं अर्धा दिवस सुटी देतात आणि आईची महति मुलांना सांगतात.

जन्मदात्या आईचें महत्त्व ह्या दिवशीं सांगण्यांत येतें. तसेंच आपल्या मोठ्या आईचें—जन्मभूमीचें—महत्त्वहि मुलांच्या मनावर ठसवावयास हवें ! 'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी' म्हणजे जन्मदात्या मातेप्रमाणें जन्मभूमीदेखील स्वर्गापेक्षा श्रेष्ठ आहे ही कल्पना मनाला पटली कीं, ह्या दोन्ही आयांसाठीं त्याग करावयाला तिचीं लेंकरें धांव घेतील ! अन् मातृदिन साजरा करण्याचें सार्थक होईल !

२२६३५

घाटावरील कांहीं गांवांतील शेतकरी ह्या दिवशीं पोळा नांवाचा सण साजरा करतात. शेतजमीन ही त्यांची अन्न देणारी आई ! तेव्हां धान्य पिकविण्याला मदत करणाऱ्या बैलांना रंगवून व श्रृंगारून ह्या दिवशीं त्यांची गांवांतून ते मिरवणूक काढतात व आपल्या अन्नदात्या आईचाच सन्मान करतात.



भारतांत प्राचीन काळापासून बैलांचें विशेष महत्त्व मानलें जातें. आर्यलोक गाईला धन मानीत. श्रीकृष्णाच्या वेळीं सुद्धां गोमातेला मोठा मान मिळे ! अन् ह्या पोळ्याच्या सणांत गोमातेच्या मुलांची—बैलांची—पूजा केल्यानें गोमातेची पूजा केल्यासारखें आहे ! स्वतःचें कौतुक होण्यापेक्षां आपल्या मुलाचें

कौतुक झाल्यामुळें आईला अधिक आनंद होतो ! तेव्हां अप्रत्यक्ष रीतीनें शेतकरी लोक गोमातेचाहि सन्मान करतात नि मातृदिन-सुद्धां साजरा करतात असें म्हणावयाला हरकत नाहीं !

**साध्वी अहिल्याबाई होळकर**

ह्याच श्रावणी अमावास्येला एका प्रेमळ, उदार स्त्रीची पुण्यतिथि येते. माता ह्या नांवाला ती पूर्ण लायक होती. स्वतःच्या मुलाचीच नव्हे, तर राज्यांतील सबंध प्रजेची प्रेमळ आई होती ती ! तिचें नांव राणी अहिल्याबाई होळकर.

नगर जिल्ह्यांत रहाणाऱ्या एका गरीब माणसाची मुलगी होती ही. तिचा स्वभाव बालपणापासून इतका न्यायी व प्रेमळ होता कीं, प्रतापी मल्हारराव होळकर तिच्यावर फार खूष झाले. आणि आपला एकुलता एक मुलगा खंडेराव ह्यांच्याबरोबर त्यांनीं तिचें लग्न लावलें. सर्वत्र आनंदी-आनंद झाला. पुढें तिला मालोराव नांवाचा मुलगा व मुक्ताबाई नांवाची मुलगी झाली !

पुढें एकाएकी खंडेराव मरण पावले. अहिल्याबाईनें नवऱ्याबरोबर सती जाण्याचा निश्चय केला पण मल्हार-रावानीं तिला अडविलें. आतां खंडेरावाच्या जागीं तूं, असें तिला सांगितलें, नि अहिल्याबाईनें म्हाताऱ्या सासऱ्याचा शब्द मानला. आणि खरोखरीच खंडेरावाची जागा भरून काढली. मल्हारराव मोहिमेवर गेल्यावेळीं ती राज्यकारभार व्यवस्थित चालवी.

मल्हाररावांच्या मृत्यूनंतर तिनें मालोरावाला राज्या-वर बसविलें व ती कारभार पाहूं लागली. पण मालोराव आचरट व दुष्ट होता. प्रजेचें पालन करण्याऐवजीं तो प्रजेचे हाल करी. आणि शेवटीं आपल्या ह्या दुष्कृत्यांचें फळ त्याला भोगावें लागलें.

तो आजारी पडला. अहिल्याबाईनें त्याची पुष्कळ शुश्रूषा केली. पण तो मरण पावला.

अहिल्याबाई स्वतःच प्रजेचे प्रेमानें पालन करी. पण नुसतीच प्रेमळ स्त्री नव्हती ती. एखाद्या चतुर मुत्सद्द्यासारखी हुषारहि होती. एकदां राघोबादादा पेशवे ह्यांनीं अहिल्याबाईवर स्वारी करण्याचा बेत केला व त्याप्रमाणें बाईंना निरोप धाडला.

मोठा कठिण प्रसंगच नाहीं का हा? पण अहिल्याबाई भ्याली नाहीं. तिनें समयसूचकतेनें वेळ निभावून नेली. राघोबा-दादाला तिनें उलट जबाब पाठविला कीं, "आपण मजवर चाल करून येणार, खुशाल या. परंतु मीं वीराची सून आहे. लढाईला मी माघार घेणार नाहीं. युद्धांत जय किंवा पराजय होणें ईश्वराच्या हातीं आहे. ह्या युद्धांत माझा पराजय झाला तर लोक माझी निंदा करतील हें भय मला वाटत नाहीं! कारण, मी बोलून, चालून बाई-माणूस! परंतु, उलटपक्षीं माझ्या सुदैवानें मी विजयी झालें तर आपल्याला केवढी लोकनिंदा सहन करावी लागेल ह्याचा विचार आधीं करा--"

बाईच्या ह्या उत्तरानें काम अचूक झालें. पेशवा खजील झाला नि लढाईचा बेत त्यानें रहित केला. पण अहिल्याबाईच्या अंगीं पुरुषाला शोभेल असा हा बाणेदारपणा असला तरी त्याच्या जोडीला अत्यंत मायाळू, उदार हृदय होतें.

तिनें नंतर आपल्या चुलत दीराला गादीचा वारस केला व इंदूरचें राज्य चांगलें नांवारूपाला आल्यावर हळूहळू आपलें मन कारभारांतून काढलें. आणि दानधर्म व ईश्वरचिंतन करण्यांत ती काळ घालवूं लागली.

म. [illegible] ठाणें, [illegible]
दा. क्र. [illegible]
दि. [illegible]

लोकांच्या उपयोगासाठीं अहिल्याबाईनें नर्मदा नदीवर घाट बांधले. ग्रीष्मऋतूंत प्रवाश्यांची तहान भागविण्यासाठीं ती ठिक-ठिकाणीं पाणपोया घाली. शरद्‌ऋतूंत गरीब लोकांना ऊबदार पांघरुणें वांटी. फार काय, तिच्या राज्यांत पशु-पक्षीसुद्धां उपाशी रहात नसत. खरोखर, संत ही पदवी तिला पूर्ण शोभत होती. ह्या जन्मीं केलेल्या कृत्यांचा जाब मरणानंतर ईश्वराला द्यावा लागतो ही कल्पना तिनें आपल्या मनावर ठसविली होती. नि ती आपल्या उच्चारांत नि आचारांत आणीत असे. म्हणूनच ती अजुनि कीर्तिरूपानें उरली आहे! हेंच मनुष्य प्राण्याला भूषणास्पद असतें! आणि म्हणूनच संत रामदासांनीं म्हटलें आहे कीं, 'मरावें परी कीर्ति-रूपें उरावें.'

यानंतर १ ऑगस्टला लोकमान्यांची पुण्यतिथि येते व ती देशभर साजरी केली जाते. लोकमान्य टिळकांची माहिती आषाढ महिन्यांत 'टिळकजयंती' मध्यें दिलेली आहेच.

### स्वातंत्र्यदिन

ऑगस्टची १५ तारीख आपण स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा करतों. १९४७ च्या ऑगस्टच्या १५ तारखेला हिंदुस्थानला स्वातंत्र्य प्राप्त झालें. सुमारें दीडशें वर्षें आपण ब्रिटिशांच्या गुलामगिरींत होतों. ऑगस्ट महिन्याच्या १४ तारखेला रात्रीं १२ वाजतां त्या गुलामगिरींतून आपण मोकळे झालों.

इंग्रजी पद्धतीप्रमाणें रात्रीं बारानंतर दुसरा दिवस धरण्यांत येतो. नि म्हणून ऑगस्ट १५ हा स्वातंत्र्यदिन मानण्यांत आला. मराठी कालगणनेप्रमाणें ही तारीख श्रावण महिन्यांत येत असते.

हा स्वातंत्र्यदिन साजरा करितांना आधीं आपल्या तिरंगी झेंड्याला वंदन करावें. नि मग स्वातंत्र्यासाठीं ज्यांनीं झीज सोसली



त्या साऱ्या थोर व्यक्तींना मनोमन वंदन करावें. आणि १८५७ सालच्या क्रांतियुद्धापासून घडलेल्या सर्व घटनांचा अभ्यास करावा. त्यामुळें आपली देशभक्ति जागी राहील. आपला देशाभिमान ताजा राहील ! आणि स्वातंत्र्यदिन योग्य रीतीनें साजरा होईल.

पहिला स्वातंत्र्यदिन साजरा करतांना दिल्लीमध्यें आपला तिरंगी ध्वज फडकविला गेला. सर्व देश स्वातंत्र्याच्या जयघोषानें दुमदुमला. मंगल वाद्यांनीं वातावरण भरून गेलें आणि चहूंकडे दिव्यांचा लखलखाट करण्यांत आला ! बरोबर आहे ! पारतंत्र्याची काळोखी रात्र संपली. आणि स्वातंत्र्याची पहांट उजाडली !

पारतंत्र्य म्हणजे एक प्रकारचा तुरुंगवासच ! त्यामध्यें अनेक सुखसोई मिळूं शकतात. नि म्हणून त्याला फार तर सोन्याचा पिंजरा म्हणतां येईल ! पण त्याला स्वातंत्र्याची सर नाहीं येणार !

त्यामुळें त्या पिंजऱ्यांतून सुटका होतांच सर्वांना विलक्षण आनंद झाला! आणि दर वर्षी हा स्वातंत्र्यदिन उत्साहानें साजरा केला जातो !

**असा** आहे हा श्रावण मास. महाराष्ट्रांतील एक श्रेष्ठ कवि कै. बालकवि ह्यांनीं आपल्या 'श्रावणमास' ह्या कवितेंत ह्या महिन्याचें मोठें छान वर्णन केलें आहे. ते म्हणतात--

**श्रावणमासीं हर्ष मानसीं हिरवळ दाटे चोहिकडे ।**
**क्षणांत येतें सरसर शिरवें, क्षणांत फिरुनी ऊन पडे ॥**
**वरतीं बघतां इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे ।**
**मंगल तोरण काय बांधलें नभोमंडपीं कुणीं भासे ॥**
**फडफड करूनी भिजले आपुले पंख पांखरें सांवरती ।**
**सुंदर हरिणी हिरव्या कुरणीं निजबाळांसह बागडती ॥**

योग्य वर्णन आहे, नाहीं का? मग आवडला ना हा श्रावण-मास ? ह्या महिन्यांतील सणादिवशीं गोडधोड खाऊन तुमचें पोट भरेल ! आणि श्रीकृष्ण, विसोबा व अहिल्याबाई ह्या थोरांचीं चरित्रें तुमचें मन तृप्त करतील ! खरें ना ?

## स्वाध्याय

(१) विसोबा खेचरांना ज्ञानेश्वरांनीं कसा धडा शिकविला ?
(२) राखी बांधण्यामागें कोणतें तत्त्व सामावलेलें आहे ? नारळी पौर्णिमेला समुद्राला नारळ अर्पण कां करतात ?
(३) भगवान् श्रीकृष्णानें लोककल्याणाचीं कोणतीं कामें केलीं ?
(४) धर्मपालकाचा मुलगा शिव दीर्घायुषी कसा झाला ?
(५) पुढील सणांचें महत्त्व सांगा.
(अ) पिठोरी अमावास्या, (ब) नागपंचमी

IRBK-0106446